**अर्जदारातर्फे साक्षीदार क्र.१ यांचा सरतपास वकील श्री. एस. व्ही. कुलकर्णी यांचेतर्फे शपथेवर पुन्हा सुरु :–**

**१०.** मी सदर प्रकरणात माझ्या साक्षीचे शपथपत्र दाखल केले आहे. त्यावर माझी सही आहे, त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे.

**सरतपास पुर्ण.**

**साक्षीदाराचा उलटतपास सामनेवालाकरिता वकील श्री. आर. ए. औताडे यांच्यातर्फे–**

**११.** माझे शिक्षण इयत्ता बारावीपर्यंत झालेले आहे. मी बारावीचे शिक्षण घेत असतांनाच डी.एम.एल.टी. या अभ्यासक्रमाकरिता प्रवेश घेतलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, डी.एम.एल.टी. चे शिक्षण झाल्यानंतर मला माझी स्वतःची पॅथॉलॉजी सुरु करता येते. हे म्हणणे खरे नाही की, डी.एम.एल.टी. या शिक्षणाच्या आधारे मला नोकरी मिळु शकते. मला दोन भाउ असुन बहिण नाही. माझ्या लहान भावाचे लग्न झालेले आहे. माझे दोन्हीही भाउ प्रभात डेअरी मध्ये नोकरी करतात. माझे वडील शेती करतात. माझ्या वडीलांच्या नावे वडीलोपार्जित दोन एकर शेतजमीन आहे. माझ्या वडीलोपार्जित शेतीमध्ये माझा हिस्सा आहे. भैरवनाथनगर येथे माझ्या वडीलांचे स्वतःचे वडीलोपार्जित घर आहे. हे मला माहिती नाही की, सदर घर हे शेतीच्या उत्पन्नातून बांधलेले आहे किंवा नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर घरामध्ये माझा सुध्दा हिस्सा आहे. माझ्या माहेरी माझे आई वडील, दोन भाउ, वहिनी याशिवाय इतर सदस्य नाही. माझी आई कोणताही कामधंदा करीत नाही. माझ्या आई वडिलांना मोठा कोणताही आजार नाही.

**१२.** हे म्हणणे खरे नाही की, सामनेवाला याच्या नावे शेतजमीन नाही. सामनेवाला याच्या नावे शेतजमीन मिळकत आहे हे दाखविण्याकरिता मी प्रकरणात कागदोपत्री पुरावा दाखल केलेला आहे. हे मला माहिती नाही की, सामनेवाला याची बहीण सुजाता ही अपंग आहे किंवा नाही. हे मला माहिती नाही की, सुजाता हिचे लग्न झाले आहे किंवा नाही. हे मला माहिती नाही की, सुजाता ही सामनेवाला याच्यासोबत राहते किंवा नाही. सामनेवाला याची आई त्याच्यासोबतच राहत असते. हे म्हणणे खरे नाही की, सामनेवाला हा मजुरीचे काम करतो. सामनेवाला याचा ट्रॅव्हलींगचा व पैशाची देवाण–घेवाण करण्याचा व्यवसाय आहे हे दाखविण्याकरिता मी सदर प्रकरणात कोणतेही कागदपत्र दाखल केलेले नाही. हे मला माहिती नाही की, सामनेवाला याचे शिक्षण बारावी नापास पर्यंतचे झालेले आहे किंवा नाही.

**१३.** हे म्हणणे खरे नाही की, सामनेवाला याचा कोणताही ट्रान्सपोर्टचा व पैशाची देवाण–घेवाण करण्याचा व्यवसाय नाही. हे म्हणणे खरे नाही की, सामनेवाला हा बारावी नापास असल्यामुळे त्याला कोणतेही काम नसुन तो केवळ मजुरी करतो. सामनेवाला याच्यावर त्याच्या आईची जबाबदारी आहे. हे म्हणणे खरे नाही की, सामनेवाला याच्यावर त्याच्या अपंग बहिणीची जबाबदारी आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी शिवणक्लास, ब्युटी पार्लरचा कोर्स केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यामधुन मला दरमहा पंधरा ते वीस हजार रुपये उत्पन्न मिळते. हे म्हणणे खरे नाही की, मी लॅब असीस्टंट म्हणुन काम करते.

**१४.** हे म्हणणे खरे नाही की, माझे लग्न सामनेवाला याच्यासोबत साध्या पध्दतीने झालेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर लग्नाकरिता सामनेवाला याने माझ्या वडिलांना रोख रक्कम रुपये एक लाख दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, सामनेवाला याने सदर रक्कम ही कर्ज काढून माझ्या वडिलांना दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, माझे सामनेवाला, त्याची आई व बहिण यांच्यासोबत पटत नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी सामनेवाला यास त्याच्या आई व बहिणीपासुन वेगळे राहण्यास म्हणत होते. हे म्हणणे खरे नाही की, सामनेवाला हा मला वेगळे घेवून शिर्डी येथे सोबत राहत होता. हे म्हणणे खरे नाही की, मी सन २०२३ च्या दिवाळीला सासरहून माहेरी आले होते. मी माहेरी राहत असतांना माझ्या वकीलांमार्फत सामनेवाला यास नोटीस पाठवून पोटगीची मागणी केली होती. सामनेवाला याने सदर नोटीसला उत्तर देवून मला नांदावयास येण्याकरिता सदर नोटीसद्वारे कळविले होते. सामनेवाला याने मला दिलेल्या नोटीसला मी परत उत्तर दिले नाही तसेच मी सामनेवालाकडे नांदावयास सुध्दा गेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सामनेवाला याचा स्वतःहून त्याग केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, सामनेवाला याची मला पोटगी देण्याची त्याची आर्थिक परिस्थिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आर्थिकदृष्टया सदन असून मी स्वतःचा उदरनिर्वाह करु शकते. हे म्हणणे खरे नाही की, सामनेवाला याने कर्ज घेवून माझ्या वडिलांना जे एक लाख रुपये दिले होते त्या कर्जाची परतफेड सामनेवाला यास करावी लागत असल्यामुळे त्याची आर्थिक परिस्थिती ढासाळलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सदर प्रकरणात माझ्या साक्षीचे खोटे शपथपत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

JITENDRA DUDHRAM JADHAO
Digitally signed by JITENDRA DUDHRAM JADHAO
Date: 2025.07.07 13:30:32 +0530

**(जितेंद्र दु. जाधव)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायालय क्र.१, श्रीरामपुर.

ठिकाण : श्रीरामपुर.
दिनांक : ०७/०७/२०२५.